प्रामाणिक शिक्षण विकास मंडळ, नांदेड संचलित ज्ञानगंगा विकास प्राथमिक शाळा, सिडको, नवीन नांदेड, जि.नांदेड या शाळेचे श्री.माणिकराव शिंदे सर्वांगिण शिक्षण विकास मंडळ, नांदेड या संस्थेस हस्तांतर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाह ३०१८/प्र.क्र.३८८/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० जून, २०१९

वाचा : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ :विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांचे जा.क्र.शिउसला/प्रावि-२/२०१७-१८/७९३६/३८, दिनांक २५ जून, २०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

प्रामाणिक शिक्षण विकास मंडळ, नांदेड संचलित ज्ञानगंगा विकास प्राथमिक शाळा, सिडको, नवीन नांदेड, जि.नांदेड या मराठी माध्यमाच्या अनुदानित प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेचे, श्री.माणिकराव शिंदे सर्वांगिण शिक्षण विकास मंडळ, नांदेड या संस्थेस हस्तांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

सदर शाळेचे, श्री.माणिकराव शिंदे सर्वांगिण शिक्षण विकास मंडळ, नांदेड या संस्थेकडे हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

१) हस्तांतरणास संमती दिलेल्या अर्हताप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल होणार नाहीत, याबाबत नवीन संस्थेच्या अध्यक्ष/सचिवांचे रु.१००/-च्या स्टँपपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र घेण्यात यावे.

२) कार्यरत अर्हताप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तीक मान्यता घेणे आवश्यक राहील

३) शासन निर्णय, दि.२८/०८/२०१५ मधील संचमान्यतेच्या सुधारीत निकषांनुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार अनुज्ञेय असलेल्या पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी शाळेत कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत, हे संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच, जादा शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही करणेबाबत व अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची कोणत्याही कारणास्तव किमान पटसंख्येची अट शिथिल केली जाणार नाही.

५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व याबाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या शासन आदेशानुसार शाळेस पक्की इमारत, सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे नवीन संस्थेवर बंधनकारक राहील.

६) सदर शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर हस्तांतरणानंतरही कार्यरत राहील.

७) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/ मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी.

८) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/ वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, शासन निर्णय व आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेवर बंधनकारक राहील.

९) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार अंमलात येईल.

१०) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदल संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेव्दारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र.(१) ची पुर्तता झाल्यावर विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सर्व बाबी तपासून व वरील अटी/शर्ती व्यतिरिक्त आवश्यक अटींचा समावेश करून, शाळेचे व्यवस्थापन बदलाबाबत ६ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२११११२१५९६४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.06.21 11:20:08 +05'30'

(प्रविण मुंढे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर.

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

४) अध्यक्ष/ सचिव, प्रामाणिक शिक्षण विकास मंडळ,दिग्रस बु., ता.कंधार, जि.नांदेड.

५) अध्यक्ष/ सचिव, श्री.माणिकराव शिंदे सर्वांगिण शिक्षण विकास मंडळ, दिग्रस (बु.), ता.कंधार, जि.नांदेड.

६) निवडनस्ती (एसएम-१)